13 FEB 2021

# लिंग समानतेसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करा

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'लिंग अभ्यास' विषयक दोनदिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषद सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लिंग समानता प्रस्थापनेच्या दृष्टीने बदलत्या काळानुरूप आधुनिक तंत्रज्ञानाचा अत्यंत प्रभावी वापर करणे शक्य आहे. या क्षेत्रातील अभ्यासक, कार्यकर्ते यांनी त्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि एस. डी. महाविद्यालय, अलापुझ्झा (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नव्वदोत्तरी कालखंडातील लिंग अभ्यास : तंत्रज्ञानात्मक बाबी व सक्षमीकरणाचे वास्तव' या विषयावर आयोजित दोनदिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात कुलगुरू बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महिला आज पुरुषांच्या तुलनेत कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. तरीही लिंगभेद नष्ट करून लिंग समानता प्रस्थापित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी करण्याची मोठी गरज आहे. तंत्रज्ञान म्हणजे केवळ संगणक, स्मार्ट फोन, इंटरनेट आदी साधने नव्हेत, तर त्या माध्यमातून ज्ञानवृद्धीच्या



कोल्हापूर : परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

शक्यता घेऊन ज्या ज्या बाबी उपलब्ध झाल्या आहेत, त्या सर्वांचा समावेश या तंत्रज्ञानाच्या व्याख्येत करायला हवा.

अध्यक्षीय भाषणात एस. डी. महाविद्यालयाचे व्यवस्थापक पी. कृष्णकुमार म्हणाले, महिलांचा समानतेबरोबरच सक्षमीकरणासाठीचा लढा हा वेगवेगळ्या माध्यमांतून लढला गेला आहे. तंत्रज्ञानामुळे महिला सबलीकरणाच्या चळवळीला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. या सर्वांचा ऊहापोह या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत होऊन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने काही ठोस बाबी निश्चितपणे सामोऱ्या येतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या उद्घाटन समारंभात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एस. डी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. उन्नीकृष्णा पिल्लाई, उपप्राचार्य डॉ. टी. आर. अनिल कुमार यांनीही आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी परिषदेच्या समन्वयक कार्थिका आर. यांनी स्वागत केले. एस. डी. महाविद्यालयाच्या इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. लीना पी. पै यांनी प्रास्ताविक केले. परिषदेच्या सचिव व बेटी बचाओ अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

# युजीसी स्ट्राईड व्याख्यानमाला उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भूगोलशास्त्र अधिविभागातील युजीसी स्ट्राईड ऑनलाईन राष्ट्रीय व्याख्यानमाला नुकतीच झाली. यात मरीन बायोडायव्हर्सिटी, पॉप्युलेशन डायनामिक, एअर पॉप्युलेशन अँड कोविड-१९ आदी विषयांवर डॉ. सब्यासाची साऊते (गोवा), डॉ. पी. के. पाठक (जेएमआय, नवी दिल्ली), डॉ. प्रसनजित आचार्य (पश्चिचत बंगाल) इत्यादी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. व्याख्यानमालेत २१३ सदस्यांनी सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय व्याख्यानमालेचे समन्वयक म्हणून डॉ. एस. दंडपथ यांनी काम पाहिले. विभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, युजीसी स्ट्राईडचे प्रमुख डॉ. एस. एस. पन्हाळकर यांचे सहकार्य लाभले.

# पदवी, पदविका प्रमाणपत्रासाठी १० मार्चपर्यंत पोस्टाद्वारे अर्ज करा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभासाठी पदवी, पदविका प्रमाणपत्रासाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज आले आहेत. पण, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका प्रमाणपत्रासाठी १० मार्चपर्यंत पोस्टाद्वारे अर्ज सादर करावेत, असे आवाहन परीक्षा, मूल्यमापन मंडळाने केले आहे. ऑनलाईन अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले होते. पण, कोरोनामुळे विद्यार्थ्यांनी आता आपले अर्ज कागदपत्रांसह पोस्टाद्वारे दीक्षांत विभागाला पाठवावेत, तसेच ऑनलाईन निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनी, ज्यांना महाविद्यालयांकडून गुणपत्रे मिळालेली नाहीत, अशांनी विहित मुदतीत १० मार्चपर्यंत पोस्टाने अर्ज पाठवावेत, असे आवाहन परीक्षा मंडळाचे संचालक पळसे यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ उपाध्यक्षपदी डॉ. सुनील चंदनशिवे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या उपाध्यक्षपदी



डॉ. सुनील चंदनशिवे यांची निवड झाली आहे. तासगाव (सांगली) येथे झालेल्या मराठी शिक्षक संघाच्या वार्षिक अधिवेशनात डॉ. चंदनशिवे यांची निवड करण्यात आली. रयत शिक्षण संस्थेच्या हुपरी (ता. हातकणंगले) येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयात डॉ. सुनील चंदनशिवे मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. डॉ. चंदनशिवे यांनी १७ संशोधन ग्रंथांचे लेखन केले आहे. मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. या निवडीबद्दल त्यांचे विकास समितीच्या चेअरमन सरोज पाटील, प्राचार्या डॉ. पी. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय भोसले, डॉ. सिंधु आवळे, प्रा. देवल तुळशीकट्टी, प्रा. मारूफ मुजावर, डॉ. रघुनाथ साळुंखे आदींनी अभिनंदन केले आहे.

# विद्यापीठाचा 'रवळनाथ'समवेत सामंजस्य करार

## अर्थसाक्षरता प्रसाराला गती अपेक्षित : कुलगुरू डॉ. शिर्के



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी यांच्यात झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत कराराचे हस्तांतरण करताना डॉ. विलास नांदवडेकर व एम. एल. चौगुले.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सहकारी क्षेत्रातील बहुराज्य संस्था असलेल्या रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीसमवेत शिवाजी विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य करारामुळे अर्थसाक्षरता प्रसार, प्रशिक्षण व संशोधन कार्याला गती येईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

आजरा येथील मल्टिस्टेट संस्था श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी व शिवाजी विद्यापीठ यांच्यात गुरुवारी व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'रवळनाथ'चे संस्थापक व अध्यक्ष एम. एल. चौगुले प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अधिकाधिक समाजाभिमुख काम या सामंजस्य कराराच्या माध्यमातून साकार व्हावे. एम. एल. चौगुले म्हणाले, अर्थ, सहकार व वाणिज्य आदी क्षेत्रांमध्ये अनेक नवनवीन प्रवाह निर्माण होत आहेत. अनेक संधी आणि आव्हाने समोर येताहेत. त्या दृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने करार उपयुक्त ठरणार आहे.

सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व एम. एल. चौगुले यांनी स्वाक्षरी केल्या.

याप्रसंगी 'रवळनाथ'च्या वतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी एक लाख रुपयांचा निधी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. प्रास्ताविक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. विजय ककडे, प्रा. विजय आरबोळे, प्रा. मीना टिंगणे, रेखा पोतदार, विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी जी. के. नाईक, विजयकुमार हरगुडे यांच्यासह अर्थशास्त्र अधिविभागातील शिक्षक उपस्थित होते.

# दीक्षान्त समारंभाचे अर्ज पोस्टाद्वारे सादर करावेत

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दीक्षान्त समारंभाचे विद्यार्थ्यांनी अर्ज आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष विद्यापीठात न येता पोस्टाने दीक्षान्त विभागास सादर करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे.

५७ व्या दीक्षान्त समारंभासाठी पदवी-पदविका प्रमाणपत्र मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज १२ जानेवारीच्या निवेदनाप्रमाणे मागवले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी दीक्षान्त अर्ज ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीतून सादर केले आहेत. अर्जासोबत निवेदनात दिल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे हार्डकॉपीसह दीक्षान्त विभागात देण्याबाबत कळवले आहे. परंतु, कोरोनामुळे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष विद्यापीठात न येता पोस्टाने दीक्षान्त विभागास सादर करावे.

ज्या विद्यार्थ्यांचे काही कारणास्तव निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाले आहेत. परंतु, गुणतक्ते महाविद्यालयामार्फत प्राप्त झाले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीतून अर्ज करावा. आवश्यक कागदपत्रांसह अर्जाची प्रत १० मार्च २०२१ पर्यंत पोस्टाने दीक्षान्त विभागात सादर करावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर.पळसे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# लिंग समानता प्रस्थापनेसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लिंग समानता प्रस्थापनेच्या दृष्टीने बदलत्या काळानुरुप आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे शक्य आहे. या क्षेत्रातील अभ्यासक, कार्यकर्ते यांनी त्या दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग व एस. डी. महाविद्यालय, अलापुझ्झा (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नव्वदोत्तरी' कालखंडातील लिंग अभ्यास : तंत्रज्ञानात्मक बाबी व सक्षमीकरणाचे वास्तव' या विषयावर आयोजित दोन दिवसीय ऑनलाईन

- **तंत्रज्ञानामुळे महिला सबलीकरणाच्या चळवळीला नवे आयाम**
- **समानतेबरोबर विविध माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी लढा**

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बीजभाषणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षीय भाषणात एस. डी. महाविद्यालयाचे व्यवस्थापक पी. कृष्ण कुमार म्हणाले, महिलांचा समानतेबरोबरच सक्षमीकरणासाठीचा लढा वेगवेगळ्या माध्यमांतून लढला गेला आहे. तंत्रज्ञानामुळे महिला सबलीकरणाच्या चळवळीला नवे आयाम प्राप्त झाले आहेत.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एस. डी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. उन्नीकृष्णा पिल्लाई, उपप्राचार्य डॉ. टी. आर. अनिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी परिषदेच्या समन्वयक कार्थिका आर. यांनी स्वागत केले. एस.डी. महाविद्यालयाच्या इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. लीना पी. पै यांनी प्रास्ताविक केले. परिषदेच्या सचिव व बेटी बचाओ अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

# महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ अधिविभाग सोमवारपासून सुरू

**कोल्हापूर :** एक वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सोमवारपासून (दि. १५) महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग सुरू होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाकडून तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

कोरोना प्रादुर्भावामुळे मार्च २०२० पासून महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग बंद होते. राज्य सरकारने १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये, विद्यापीठात ४० अधिविभाग सुरू होणार आहेत. वसतिगृहांची स्वच्छता, सॅनिटायझेशन, विद्यार्थ्यांची सुरक्षा, इतर जिल्हे व परराज्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे नियोजन, इलेक्ट्रिक, फायर ऑडिटची कार्यवाही पूर्ण होत आली आहे.

# मनोरंजन, प्रबोधनाचा सोंगी भजनाला वारसा

## घाटमाथ्यावर सोंगी भजन रुजले : सोंगातून सामाजिक प्रश्नावर भाष्य

संदीप खांडेकर :
सकाळ वृत्तसेवा

» जागर लोककलांचा - भाग ६



सोंगी भजनातील रामायणावर आधारित एक प्रसंग.

- सोंगी भजनाचा रंगमंच चौकात किंवा चौथऱ्यावर
- ज्या त्या भारूडाला शोभेल अशा पद्धतीची वेशभूषा
- भजनाची रंगभूषा गडद स्वरूपाची
- भजनात नेपथ्य खूप कमी
- प्रसंग दाखविण्यासाठी पडद्यांचा वापर नाही

कोल्हापूर, ता. १२ : डोक्यावर पांढरी टोपी, अंगात सदरा व पायजमा ही पंचपदी सादर करणाऱ्यांची वेशभूषा. त्यांची संख्या कमीत कमी दहा व जास्तीत जास्त पंधरा. त्यात एक तबला अथवा ढोलकी, एक हार्मोनियमवादक आणि बाकीचे टाळकरी. हे वर्णन सोंगी भजनाची पाळेमुळे घट्ट ठेवलेल्या लोककला प्रकाराचे आहे. जे आजही परंपरेने चालत आले असून, त्याचे अस्तित्व पाहायला मिळते.

कोकणात दशावतारी नाटकाची परंपरा रूढ झाली. त्यापद्धतीने घाटमाथ्यावर सोंगी भजन सुरू झाले. मनोरंजन व प्रबोधनाचा धागा एकमेकांत विणत भजनातून लोक जागर करण्याचे काम आजही नेटाने सुरू आहे. सोंगी भजन खेड्यात मनोरंजनाचे मुख्य माध्यम मानले जाते. ते रात्री सादर केले जाते. पंचपदी करूनच सोंगी भजनात रंग भरायला सुरुवात होते. पंचपदीत पाच अभंग म्हटले जातात.

लोककलाकारांची रंगभूषा, वेशभूषा झालेली नसेल तर अभंगाची संख्या वाढवली जाते. पंचपदीला सुरुवात झाल्यानंतर प्रेक्षकांत शांततामय वातावरण निर्माण केले जाते. अभंगामुळे सोंगी भजनाला पूरक वातावरण तयार होते. पंचपदीनंतर गणेशाची वेशभूषा आणि रंगभूषा केलेला कलाकार रंगमंचावर येऊन गणेशवंदन करतो. त्यानंतर एक सूत्रधार किंवा निवेदक सोंगीभजनी मंडळाविषयी थोडक्यात माहिती देतो आणि भारूड सुरु होते. भजनात पाच भारूडे सादर केली जातात. भारूडात पूर्ण सोंगी भजन सादर करुन प्रेक्षकांना एकाच जागी खिळवून ठेवले जाते.

भारूडे पौराणिक व सामाजिक स्वरूपाची असतात. नवरा-बायकोची भांडणे, सासू- सूनेचा झगडा असे सामाजिक आशय असणाऱ्या कथा सादर केल्या जातात. शिवा शेतकरी, अरे संसार संसार अशा प्रकारची सामाजिक भारूडेही सादर केली जातात.